# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 13/12/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

14107

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिंब/पो.कर्म-हजर/2019
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 13 DEC 2019

---

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पत्र क्रमांक पोअय/आली/-80सी/आंजिब/गावंडे/ 13563/2019 दिनांक 04/12/2019 अन्वये पोशि/2488 विशाल गावंडे यांना या आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, अकोला यांचे पत्र क्रमांक आशा-33-क/आंजिब/पोशि-2488/18507/2019 दिनांक 11/12/2019 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 13/12/2019 रोजी म.नंतर हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

पोशि/2488 विशाल गावंडे यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **124** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, पो.स्टे आर्णी येथे करण्यात येत आहे.
**(मा.पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये)**

13·12·

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ
करिता

प्रति,

पोशि/124 विशाल गावंडे नेमणुक, आर्णी

**मार्फत :-** ठाणेदार पो.स्टे आर्णी

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-1/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक / वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, अकोला

2/- विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

14101

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/नेमणुक/रणखांब/ /2019
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 13 DEC 2019

## आदेश

पोहवा/784 आनंदराव रणखांब नेमणुक, बॉम्ब शोधक नाशक पथक, यवतमाळ यांना त्यांचे विनंती नुसार पो.स्टे पारवा येथे नेमणुक करण्यात येत आहे.

प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद पोलीस कर्मचारी यांना तात्काळ पो.स्टे पारवा येथे हजर होणे कामी कार्यमुक्त करावे.

(एम. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे पारवा/बॉम्ब शोधक नाशक, पथक यवतमाळ

प्रत,

वेतन लिपीक-1/सआलि-2/राजपत्र लिपीक यांना माहितीं व योग्य त्या कार्यवाहिस्तव

14102

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/आजिंब/पो.कर्म-हजर/2019
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 13 DEC 2019

## आ दे श

या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोअय/आली/-80सी/आंजिब/पो.कर्म/3967/5907/2019 दिनांक 27/05/2019 अन्वये **चापोशि/3967 दादाराव मिराशे** यांना या आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर आंतरजिल्हा बदली करिता स्विकृती देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचे पत्र क्रमांक आशा-3/कार्यमुक्त/मिराशे/3967/484/2019 दिनांक 05/12/2019 अन्वये नमुद पोलीस कर्मचारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ या घटकात आंतर जिल्हा बदली वर हजर होणे करिता कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 11/12/2019 रोजी म.नंतर हजर झाले आहेत.

सदर कर्मचारी यांची सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक 6/236/87 दिनांक 16/2/1987 अन्वये लावण्यात येईल.

**पोशि/3967 दादाराव मिराशे** यांना या घटकात आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना या जिल्हयाचा रिक्त बंन **169** देण्यात येवुन त्यांची नेमणुक, मोटर परिवहन विभाग, यवतमाळ येथे करण्यात येत आहे.

(एम्. राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,
पोशि/169 दादाराव मिराशे नेमणुक, मोटर परिवहन विभाग, यवतमाळ

**मार्फत :-** प्रभारी अधिकारी मोटर परिवहन विभाग, यवतमाळ

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-1/राजपत्र लिपीक / भविष्य निर्वाह निधी लिपीक / वस्त्र भांडारपाल, राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेषित- :- पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण
**2/-** विनंती की, नमुद कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास सत्वर पाठविण्यात यावे.

# भाग २ - रजा

क्रमांक : पोअय/सआली -२ / अ.र. रोखीकरण-२०१९-२०/२०१९, 14108 यवतमाळ दिनांक 13 DEC 2019

**आदेश**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः-अरजा-२४०१ /७/सेवा-९ दिनांक १५/०१/२००१ अन्वये म.ना.सेवा (रजा)नियम १९८१ मधील ७३ ची अर्जीत रजेचे प्रत्यार्पण करण्याची मुळ तरतुद दिनांक ०१/०२/२००१ पासून वगळण्यात आली होती. त्यास अपवाद करुन पोलीस दलातील पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंतच्या कर्मचा-यासाठी एक वित्तीय वर्षात १५ दिवसाच्या अर्जीत रजेच्या प्रत्यार्पणास शासन निर्णय गृह विभाग क्र एलव्हीई -२००२/प्र क्र-५६४/ पोल-ब-दि २७/२/२००४ अन्वये शासनाने मंजूरी दिली आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव | ब. न. | पदनाम | नेमणुक | एकुण रजा | रजा रोखीकरण | शिल्लक रजा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुनिल आनंद पैठणे | ६७७ | पोशि | यवतमाळ शहर | १४० | १५ दिवस रजा रोखीकरण मंजुर | १२५ |

सदरचा खर्च " २०५५-पोलीस -१०९जिल्हा पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस दल-वेतन " व "२०५५-पोलीस १०८ राज्य मुख्यालय पोलीस (०२)शहर पोलीस (०२)(०१) आस्थापना " या लेखाशिर्षाखालील मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

वेतन लिपीक -१ लेखा शाखा/डीपीजी लिपीक ,आस्थापना शाखा , पो.अ.कार्यालय यवतमाळ.

**प्रत**

ठाणेदार , पो.स्टे. यवतमाळ (शहर) याना माहितीस,

क्रमांक -सआली-२/सिक /परिवर्तीत रजा /२०१९, 14109 यवतमाळ, दिनांक- 13 DEC 2019

# आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा म.ना.से रजा नियम १९८१ चे नियम क्रमांक (६१) व (५१)अन्वये नमुद वैद्यकीय कालावधी हा परिवर्तीत रजेत रुपांतरीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचारी नाव/पद/बनं | नेमणुक | मंजूर वैद्यकीय कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोशि/५३७ श्याम दंवडे | पो. मुख्यालय | दि.१०.१०.२०१९ ते १८.१०.२०१९ पावेतो ०८ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| २ | सपोउपनि/५१० मधुकर कांबळे | पो. मुख्यालय | दि.०७.११.२०१९ ते २२.११.२०१९ पावेतो एकुण १६ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| ३ | सपोउपनि/६१० बालाजी ससाने | वडगाव जंगल | दि २५.०१.२०१९ ते २८.०१.२०१९ पावेतो ०३ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| ४ | पोना/७८६ फत्तेसिंग साबळे | पुसद शहर | दि.२४.१०.२०१९ ते ०६.११.२०१९ पावेतो एकुण १३ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| ५ | मपोना/९३४ अर्चना सुपारे | दिग्रस | दि.०६.११.२०१९ ते १७.११.२०१९ पावेता एकुण १० दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| ६ | सपोउपनि/७७६ नरेंद्र मानकर | लोहारा | दि १९.०८.२०१९ ते २७.०८.२०१९ पावेतो एकुण ०८ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |

12.12.

**(एम.एम.बागवान )**
पोलीस उप अधिक्षक, (मुख्या)
पोलीस अधिक्षक,कार्यालय यवतमाळ.

**प्रति,**

पोनि. पोलीस मुख्यालय यवतमाळ/वडगाव जंगल/दिग्रस/लोहारा याना माहितीस

**प्रत,**

वेतन लिपीक -१ लेखा शाखा /डिपीजी लिपीक आस्थापना शाखा यांना योग्य त्या कार्यावाहीस्तव

क्रमांक -सआली-२/सिक /परिवर्तीत रजा /२०१९, 14110 यवतमाळ, दिनांक- 13 DEC 2019

## आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा म.ना.से रजा नियम १९८१ चे नियम क्रमांक (६१) व (५१)अन्वये नमुद वैद्यकीय कालावधी हा परिवर्तीत रजेत रुपांतरीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचारी नाव/पद/बनं | नेमणुक | मंजूर वैद्यकीय कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोना/६९३ मारोती राठोड | उमरखेड | दि.०६.०५.२०१९ ते १७.०६.२०१९ पावेतो ४१ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| २ | पोशि/६८१ लखन जाधव | पोफाळी | दि.०९.०५.२०१९ ते २४.०५.२०१९ पावेतो एकुण १६ दिवस **परावर्तीत** रजा मंजुर |
| ३ | पोहवा/५९६ देविदास आठवले | दारव्हा | दि १९.०३.२०१९ ते ०४.०४.२०१९ पावेतो १५ दिवस **विनावेतन** रजा मंजुर |

**(मा. पोलीस अधिक्षक , यांचे मान्यतेने ...)**

12.12.

**(एम.एम.बागवान )**
पोलीस उप अधिक्षक, (मुख्या)
पोलीस अधिक्षक,कार्यालय यवतमाळ.

**प्रति,**

ठाणेदार , पो.स्टे. उमरखेड /पोफाळी/ दारव्हा याना माहितीस

**प्रत,**

वेतन लिपीक -१ लेखा शाखा /डिपीजी लिपीक आस्थापना शाखा यांना योग्य त्या कार्यावाहीस्तव

क्रमांक :डीपी/३१-बी २/पोका-७९४ देवानंद /रद्द / 14123 /२०१९ यवतमाळ दिनांक 13 DEC 2019

संदर्भ -१) या कार्या.आदेश क्र. -डीपी/३१-बी -२/ अनधिकृत गैरहजर/१२५७०/२०१९ यवतमाळ दि.७/११/२०१९

## आ दे श

पोका/७९४ देवानंद जाधव नेमणुक- पोलीस स्टेशन नेर यांची वरील संदर्भान्वये दि.१९/४/२०१६ ते १२/११/२०१६ पर्यंत एकुण २०८ दिवस कर्तव्यावर गैरहजर असल्याकारणाने एकुण २०८ दिवस असाधारण रजा मंजुर करण्यात आली आहे. सदर कर्मचारी हे सदर कालावधीमध्ये आजारपणाचे कारणास्तव रजेवर गेले असल्याने, अनधिकृतपणे गैरहजर कालावधी "असाधारण रजा" मंजुरीचा संदर्भाधिन आदेश रद्द करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोका/७९४ देवानंद जाधव नेमणुक- पोलीस स्टेशन नेर

प्रत, वेतन लिपीक-१/.आस्थापना लिपीक/ सआली २/डि.पी.जी लिपीक /पो.स्टे.नेर यांना माहीतीस व उचित कार्यवाहीस.

क्रमांकः आशा-५/५१-डी/ परावर्तीत रजा/विविध/२०१९/ 14115 यवतमाळ दिनांक-
13 DEC 2019

## आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा म.ना.से.रजा.नियम १९८१ चे नियम क्रमांक(६१)व (५१)अंन्वये नमुद वैदयकीय कालावधी हा परावर्तीत व अर्जीत रजेत रूपांतरीत करण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | नेमणुक पो.स्टे | उपभोगलेला कालावधी दिवस | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | पोना/२२३७,शैलेश झंझाड | पुसद शहर | दि.१७/११/१९/ते २६/११/२०१९/०९ दिवस | परावर्तीत रजा |
| २ | मनापोका/२११४,प्रिती पोयाम | मुकुटबन | दि.२१/८/१९/ते १०/९/२०१९/ १८ दिवस | परावर्तीत रजा |
| ३ | मपोशी/२६८०,जयश्री कदम | पोफाळी | दि.६/७/१९/ते२०/७/२०१९/१४ दिवस | परावर्तीत रजा |
| ४ | पोका/२१८३,माधव वाढवे | --०-- | दि.८/७/१९/७/८/२०१९/ ३०दिवस | परावर्तीत रजा |
| ५ | नापोशी/२०१२,रावसाहेब शेंडे | --०-- | दि.१०/७/१९/ते २४/७/२०१९/१५ दिवस | परावर्तीत रजा |
| ६ | पोकॉ/२०५६सागर चिरडे | वडगाव जंगल | दि.१३/७/१९/ते ३०/७/२०१९/१७ दिवस | परावर्तीत रजा |
| ७ | मपोशी/२५८३,मिनाशी जंगले | अवधुतवाडी | दि.१९/९/१९/ते ९/१०/२०१९/१९ दिवस | परावर्तीत रजा |
| ८ | पोकॉ/२३४३,नितीन खवडे | उमरखेड | दि.५/११/१९/ते १४/११/२०१९/०९ दिवस | परावर्तीत रजा |
| ९ | मपोका/२७००,राधा जाधव | --०-- | दि.१४/६/१९/ते २८/६/२०१९/१५ दिवस | परावर्तीत रजा |

(मा.पो.अधिक्षक यांचे आदेशान्वये)

13.12.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक(मुख्या)
पोलिस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

वरील सबंधीत सर्व ठाणेदार.

प्रत -वेतन लिपीक-1यांना व्दिप्रतीत/डीपीजी लीपीक यांना आवश्यक कार्यवाही

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक :- पोअय/सआलि2,5/अंतिम रजा रोखीकरण/ 14118 /2019 यवतमाळ, दिनांक :- 13 DEC 2019

**आदेश**

1) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक:-अरजा-2401 /7/सेवा-9 दिनांक 15/01/2001

2) शासन निर्णय क्रमांक अरजा-2019/प्र/क्र12/सेवा-6 दिनांक 24/05/2019 अन्वये दिनांक 01 जानेवारी 2016 पासुन राज्य शासकिय कर्मचा-यांना सुधारित वेतनसंरचना लागु केली आहे. त्या अनुषंगाने दिनांक 01 जानेवारी 2016 रोजी व त्यानंतर सेवानिवृत्त/निधन झालेल्या/होणा-या शासकिय कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या रोखीकरणाच्या परिगणनेसाठीचे वेतन हे मॅट्रिक्स मधील वेतन स्तरानुसार विचारात घेवुन त्यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या शिल्लक अर्जित रजेच्या संबधातील रजा वेतनाची सममुल्य रोख रक्कम, एका ठोक रकमेत रोखिने प्रदान करण्यात यावी. याबाबत नमुद केले आहे.

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी दिनांक 01/01/2016 नंतर सेवानिवृत्त होवुन त्यांना असुधारित वेतन संरचनेतील वेतनाच्या आधारे शिल्लक अर्जित रजेच्या रोख सममुल्याची रक्कम यापुर्वी अदा केलेली आहे. त्यांना दिनांक 24/05/2019 चे शासन निर्णयाच्या अनुषंगाने फरकाची रक्कम रोखीने प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी नाव | बंन | पदनाम | जमा रजा | 06 वेतन आयोगाप्रमाणे अदा करण्यात आलेली रक्कम | | 07 वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील वेतन | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वेतन | ग्रेड पे | | |
| 1 | यशवंत राठोड | 279 | सपोउपनि | 300 दिवस | 14000 | 2400 | 43600/- | 30/05/2018 |
| 2 | केरु वारे | | यांत्रिक | 300 दिवस | 18440 | 3350 | 55800/- | 30/06/2019 |

वर नमुद सेवानिवृत्त/निधन झालेल्या पोलीस कर्मचा-यांना शिल्लक अर्जित रजेच्या रोख सममुल्याची फरकाची रक्कम सन 2019-2020 या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष 20550168 जिल्हा पोलीस बल-01-वेतन या लेखा शिर्षाखाली अनुदानातुन खर्च करण्यास व भागविण्यास मंजुरी देत आहे.

( एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक -1/राजपत्र लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

प्रत

कोषागार अधिकारी, यवतमाळ

# भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र :डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ./पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंग ठाकुर / 14112 /२०१९ यवतमाळ दि. 13 DEC 2019

संदर्भ :- १) प्रा.चौ.आ.क्र. :- डीपी/३१-बी/प्रा.चौ/पोहवा-१२४५ ठाकुर/१४१९६/२०१८ दि.०१/११/२०१८
२) वि.चौ. आ.क्र. :- डीपी/३१-बी/बि.चौ/पोहवा-१२४५ ठाकुर/२०८/२०१९ दि.०५/०१/२०१९

**अंतिम आदेश**

**अपचा-यांचे नांव :-** पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंह ठाकुर, तात्का नेमणुक, पोलीस मुख्यालय,यवतमाळ
सध्या नेमणुक पो.स्टे.राळेगांव

**दोषारोप :-**

आपण पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंग प्रल्हादसिंग ठाकुर तत्कालीन नेमणुक पो.मु.यवतमाळ सध्या नेमणुक पो.स्टे राळेगांव आपण दि.३०/१०/२०१८ रोजी वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय,यवतमाळ येथील श्रोत्रृ सभागृहाच्या मागील बाजुस असणा-या हनुमान मंदिराजवळ खुल्या जागेत सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशिररीत्या गांजा या अमली पदार्थाचे सेवन करतांना मिळुन आले. त्यावरुन आपणाविरुध्द पो.स्टे.यवतमाळ शहर येथे अप.क्र.१०३९/२०१८ कलम ८(क)२७ एन.डी.पी.एस,ॲक्ट १९८५ अन्वये दि.३०/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आपले कृत्य हे जनमानसात पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करणारी व शिस्तप्रीय खात्याला अशोभनिय असुन आपण पोलीस विभागाची प्रतिमा मलीन करणारे गैरवर्तन करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे आदेश डीपी/३१-बी/वि.चौ/पोहवा-१२४५ ठाकुर/२०८/२०१९ दि.०५/०१/२०१९ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर विभागीय चौकशी मध्ये साक्षिदार व दस्तऐवजाच्या पुराव्यावरुन आपण कै.वसंतराव शासकिय रुग्णालय,यवतमाळ येथील श्रोत्र सभागुहाच्या मागील बाजुस असणा-या हनुमान मंदीराजवळ खुल्या जागेत सार्वजनिक ठिकाणी तेथील असणारे व्यक्ती सोबत बेकायदेशीर रित्या गांजा या अमली पदार्थाचे सेवन करतांना घटनास्थळी मिळुन येणे हे कृत्य पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करणारे आहे.

उपरोक्त अत्यंत गंभीर कसुरी प्रकरणी आपणास मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६ मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal ) ही शिक्षा का देण्यात येवू नये ? तसेच निलंबन कालावधी दि. ०१/११/२०१८ ते ०४/०१/२०१९ पावेतोचा जशाच्या तसा (As Sach) का करण्यांत येवू नये ? म्हणुन दि.०६/११/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस दि.०९/११/२०१९ रोजी स्विकारुन प्रस्तावित शिक्षेचे का.दा.नो.वर आपण दि.२१/११/२०१९ रोजी स्पष्टिकरण सादर केले. आपण सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नाही. आपल्या कर्तव्यातील वर्तणुक ,कृत्य हें अत्यंत गंभीर, बेशिस्तीचे असल्याचे केलेल्या चौकशीत दिसुन आले आहे. अश्याप्रकारचे कर्तव्यातील गैरवर्तन पोलीस खात्याच्या शिस्तीस धरुन नाही. व जनमाणसात पोलीस खात्याची प्रतिमा मलीन करणारी आहे. प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ,याव्दारे अपचारी पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंह ठाकुर,यवतमाळ जिल्हा पोलीस दल यांना **मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६मधिल नियम ३ (१) (३) चे तरतुदीनुसार सेवेतून बडतर्फी (Dismissal )** ही शिक्षा आदेश स्विकारलेच्या दिनांक पासुन देण्यात येत आहे. **तसेच दि.** ०१/११/२०१८ ते ०४/०१/२०१९ **पावेतोचा निलंबन कालावधी जसाच्या तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

अपचारी जर शिक्षेणे व्यथित होत असतील तर हा आदेश स्विकारलेच्या दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरिक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे कडे या कार्यालया मार्फत दोन प्रतित अपिल अर्ज सादर करु शकतात.

( एम.राज कुमार)
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रती:-**

पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंह ठाकुर, तात्का नेमणुक, पोलीस मुख्यालय,यवतमाळ
सध्या नेमणुक पो.स्टे.राळेगांव

**मार्फत :-** ठाणेदार पो.स्टे.राळेगांव

२/- सोबत अ.आ २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी.

**प्रत :-** आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /वेतन लिपीक- १/डिपीजी लिपीक /पेन्शन लिपीक यांना उचित कार्यवाहीस

क्रमांक :- डीपी/३१-बी-२/बदली आदेश/ 14122 /२०१९ यवतमाळ दि. 13 DEC 2019

संदर्भ :- १) पोअय/आली-८०/संलग्न/२९७/२०१९ यवतमाळ दि.२०/१०/२०१९

२) डीपी/३१-बी-२/बं.ग.गै./मपोशि ११९२+४/कसुरी/१२१३०/२०१९ यवतमाळ दि.२४/१०/२०१९

## अंतिम आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी संदर्भ क्र. २ प्रमाणे केलेल्या कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे का.दा.नो.क्र. डीपी/३१-बी-२/बं.ग.गै./मपोशि ११९२+४/कसुरी/१२१३०/२०१९ यवतमाळ दि.२४/१०/२०१९ अन्वये " दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती " (अपरीणामकारक) ही शिक्षा देण्याचे प्रस्तावित करण्यात आली असुन आपण सादर केलेले लेखी स्पष्टीकरण व आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेले तोंडी स्पष्टीकरणाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन प्रस्तावित शिक्षा रद्द करण्यात येत आहे.

तसेच खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना संदर्भ क्र.२ प्रमाणे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/आली-८०/संलग्न/२९७/२०१९ यवतमाळ दि.२०/१०/२०१९ रोजी दि.२०/१०/२०१९ रोजी प्रशासकीय कारणास्तव पोलीस मुख्यालय,यवतमाळ येथुन तक्त्यामध्ये दर्शविलेल्या ठिकाणी संलग्न करण्यात आले होते.

| अ.क्र. | कर्मचारी नाव व ब.नं. | सध्याचे ठिकाण | संलग्नचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | पोका/१९०६ सुनिल नलगंटीवार | पो.मु.यवतमाळ | बिटरगाव |
| २ | पोका/७१८ लोकेश मसराम | पो.मु.यवतमाळ | महागाव |
| ३ | पोका/११९७ आकाश सुर्यवंशी | पो.मु.यवतमाळ | दराटी |
| ४ | पोका/१३५२ सचिन देवकर | पो.मु.यवतमाळ | पारवा |
| ५ | मपोका/११९२ मंजु शेंदरे | पो.मु.यवतमाळ | वडकी |

तथापि त्यांना ह्या आदेशान्वये पोलीस मुख्यालय,यवतमाळ येथे पुर्वीच्या ठिकाणी परत (क्यु.आर.टी.पथक) करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

प्रभारी अधिकारी बिटरगाव/महागाव/दराटी/पारवा/वडकी

२/- नमुद प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद असलेल्या पो.कर्मचारी यांना पुर्वीच्या नेमणुकीच्या ठिकाणी परत करावे.

प्रत - वेतन लिपीक -१/ कर्म.आस्थापना लिपीक/सआली २,३,४/डीपीजी लिपीक/रापोनि,पो.मु.यवतमाळ / पोका-१९०६ सुनिल (बिटरगाव)/पोशि-७१८ लोकेश (महागाव) / पोशि/११९७ आकाश (दराटी) /पोशि-१३५२ सचिन (पारवा) /मपोशि-११९२ मंजु (वडकी ) यांना माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीस

# बिनतारी संदेश

प्रति - ठाणेदार, पो.स्टे.नेर/वसंतनगर/शिरपूर/महागाव/लाडखेड/लोहारा(.)हस्ते नियंत्रण कक्ष

माहितीस :- उविपोअ-यवतमाळ/दारव्हा/पुसद/वणी/उमरखेड(.)

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ (.)

क्र. प्रलि/८०-सी/सेवांतर्गत प्रशिक्षण /१००(१)/२०१९ यवतमाळ, दिनांक-१३/१२/२०१९

**परिक्षेत्रीय सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत** **दिनांक १६/१२/२०१९ ते १७/१२/२०१९** या कालावधीत **नवीन पोलीस मुख्यालय, वाशिम** येथे **मालमत्तेच्या गुन्हयाचा तपास** या विषयावरील प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता खालील नमुद पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात येत असुन त्यांनी साध्या गणवेषात प्रशिक्षणाचे सर्व तयारीनिशी **दिनांक १६.१२.२०१९ रोजी सकाळी ०९-०० वा. पावेतो नवीन पोलीस मुख्यालय, वाशिम येथे** न चुकता हजर राहावे (.) त्याचप्रमाणे निवडण्यात आलेले पोलीस अधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणाकरीता पाठवू /हजर राहू शकत नसल्यास त्यांचेऐवजी संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्याच पोलीस स्टेशनमधील अन्य अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता पाठवावे (.) प्रशिक्षणास गैरहजर राहणारे अधिकारी यांची मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांचेमार्फत गंभीर दखल घेण्यात येवून शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे (.) त्यामुळे संबंधित प्रभारी अधिकारी यांनी, प्रशिक्षणाकरिता निवडण्यात आलेले पोलीस अधिकारी यांना पाठविण्यास टाळाटाळ करु नये (.)

| अ.क्र. | पो.अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमणुक | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | सपोनि/योगेश इंगळे | पोस्टे.नेर | 9130011691 |
| २ | सपोनि/आशिष इंगळे | पो.स्टे.वसंतनगर | 9923206655 |
| ३ | पोउपनि/ज्ञानेश्वर धावळे | शिरपूर | 8108057700 |
| ४ | पोउपनि/अश्विनी मोरे | पोस्टे.महागाव | 7020389643 |
| ५ | पोउपनि/तुकाराम ढोके | पोस्टे.लाडखेड | 7447253849 |
| ६ | पोउपनि/कवडु चांदेकर | पोस्टे. लोहारा( नियंत्रण कक्ष) | 9420118477 |

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

( सुशीला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, पोलीस नियंत्रण कक्ष.**

**२/- प्रशिक्षणास निवड करण्यात आलेल्या उपरोक्त सर्व पोलीस अधिकारी यांना तात्काळ त्यांचे दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करुन सदर प्रशिक्षणाकरिता हजर राहणेबाबत सुचीत करावे. त्यांचेशी दुरध्वनीवर संपर्क न झाल्यास संबंधित पोस्टे.प्रभारी यांचेशी संपर्क करुन अधिकारी यांना प्रशिक्षणास पाठविणेबाबत सूचना दयाव्यात.**

प्रतीलीपी :- नियंत्रण कक्ष/रा.पो.नि.पो.मु./प्रवास भत्ता लिपीक/प्रशिक्षण लिपीक/डी.पी.जी.लिपीक

प्रत-पोलीस अधीक्षक, वाशिम यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.